महाराष्ट्र शासन

शासकीय तंत्र निकेतन,वाशिम

रिसोड रोड लाखाळा,वाशिम ता.जि.वाशिम फोननं. (07252)232252,232085

Email ID - gpwashim@rediffmail.comWeb Site - www.gpwashim.edu.in

जा.क्र.शातंनिवा/मु.वसतीगृह/२०१७/2986

दिनांक : २५/७/२०१७

मुलींच्या वसतीगृहात प्रवेश प्रक्रिया सुरु

अल्पसंख्याक समाजातील उच्च शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थीनींसाठी शहरातील सिव्हील लाईन भागात असलेल्या वसतीगृहामध्ये शैक्षणिक वर्ष २०१७-२०१८ च्या प्रवेशासाठी इच्छुक विद्यार्थ्यीनीचे अर्ज महाविद्यालयामार्फत मागविण्यात येत आहेत. सदर वसतीगृहामध्ये ७०% अल्पसंख्यांक समाजातील मुलींसाठी राखीव असतील उर्वरीत ३०% जागा बिगर अल्पसंख्यांक मुलींसाठी असतील ७०% जागाच्या प्रवेशाकरिता अर्ज प्राप्त न झाल्यास किंवा जागा शिल्लक राहिल्यास सदर जागा बिगर अल्पसंख्यांक मुलींमधुन भरण्यात येतील. वसतीगृहात मागील सत्रात राहत असलेल्या विद्यार्थीनींना नियमानुसार प्राधाम्य देण्यात येईल. वसतीगृहात प्रवेश दहावीतील गुणांच्या टक्केवारीनुसार देण्यात येईल वसतीगृहात प्रवेशासाठी विद्यार्थीनींना प्रत्येक सत्रासाठी २८५० रु शुल्क आकारणी राहील परंतु, अल्पसंख्यांक कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न दोन लाख पन्नास हजार रुपयापेंक्षा कमी असल्यास त्यांना शुल्क माफ असेल. विद्यार्थीनींनी महाविद्यालयाच्या प्राचार्या मार्फत अर्ज व आवश्यक कागदपत्रे दि. २९/७/२०१७ पर्यंत सादर करावे.

प्रवेश प्रक्रिया दि. २/८/२०१७ ह्या तारखेला सकाळी ११ वा. राबविण्यात येईल. त्यासाठी सर्व विद्यार्थीनी व पालकवर्ग यांनी वसतीगृहात उपस्थित राहावे. असे प्राचार्य शासकीय तंत्रनिकेतन, वाशिम यांनी आवाहन केले आहे.

वरील माहिती शासकीय तंत्रनिकेतन, वाशिम च्या संकेतस्थळावर उपलब्ध आहे. (www.gpwashim.edu.in)

प्राचार्य

शासकीय तंत्रनिकेतन, वाशिम

प्रत,

मा. संपादक दैनिक .....

वरील बातमी प्रकाशित करावी ही विनंती.